○ प्रकरण पाचवे ○

# काँग्रेस पक्षासाठी योगदान

# प्रकरण पाचवे

# कॉंग्रेस पक्षासाठी योगदान

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये श्री. तुळशीदास जाधव यांनी आपल्या कर्तृत्वाने प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला. व तो राजकारणातील अनेक महत्वाची पदे भोगून सार्थक केला. त्यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये प्रथम सोलापूर जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होण्याचा बहुमान मिळवला व नंतर ते 1937 ते 1957 पर्यंत विधीमंडळाचे सदस्य म्हणून कार्य केले. त्यानी 1962 मध्ये नांदेड लोकसभा मतदार संघातून निवडून येऊन लोकसभेमध्ये प्रतिनिधीत्व केले व 1967 मध्ये बारामती लोकसभा मतदार संघातून निवडून येऊन आपण कोणत्याही मतदार संघामध्ये आपल्या जनसंपर्काने निवडूनयेऊ शकतो हे सिध्द करून दाखवले.

## 1971 ची निवडणूक –

1971 ची निवडणूक जाहीर झाली होती. तेव्हा कोणाला कोणत्या मतदार संघात उमेदवारी द्यावयाची याची चर्चा चालू होती. महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्हयातून तुळशीदास जाधव निवडून येऊ शकतात. परंतु महाराष्ट्राच्या बाहेर उमेदवारी दिली तर ते निवडून येऊ शकतील का ? अशी चर्चा सुरू झाली. परंतु त्यांच्या जन संपर्कामुळे ते कोणत्याही मतदार संघात निवडून येऊ शकतात हे सिध्द होते. तेव्हा 1971 च्या निवडणूकीच्या वेळी मध्यप्रदेशातील बैतुल या मतदार संघातून तुळशीदासजींना उभे करण्याचे ठरवले होते. तेंव्हा ते नवीन जबाबदारीने भारावून गेले. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्यांच्या उमेदवारीने कोणत्यातरी स्थानिक नेत्याची प्रतिष्ठा कमी

होणार होती. म्हणून कांही व्यक्तींनी आपली प्रतिष्ठा पणाला लावून तुळशीदासजींची उमेदवारी मागे घ्यावयास ला वली. परंतु या निर्णयाने तुळशीदास नाराज झाले नाहीत. कारण आपणाला संधी मिळाल्याने पक्षामध्ये जर कांही मतभेद होणार असतील पक्षाचे नुकसान होणार असेल तर त्या संधीची आपणाला गरज नाही. अशा प्रकारचे मत त्यांनी व्यक्त करून आपणाला उमेदवारी नाकरली. तरी आपण कॉंग्रेस पक्षाची जबाबदारी घेऊन पक्षाची प्रतिष्ठा व मान उंचावण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.[1]

भारतीय व्यापार वाढवायचा असेल तर त्यासाठी देशातील अंतर्गत रस्ते सुरक्षित असले पाहिजेत. त्यासाठी मालाची ने–आण करण्यासाठी व लोकांना सुखाचा प्रवास करण्यासाठी भारतामध्ये रस्ते व्यवस्थित असले पाहिजेत. ते लक्षात आल्यानंतर, 1968 मध्ये "स्टडी ग्रुप ऑफ रोड सेफटी कमिटी नावाची एक कमिटी स्थापन केली व त्या कमिटीचे चेअरमन म्हणून 1969 मध्ये श्री. तुळशीदास जाधव यांची नेमणूक करण्यात आली. तेव्हा रस्ते कसे सुरक्षित असावेत याची पहाणी करून रिपोर्ट सादर करण्यासाठी त्यांनी देशभर प्रवास केला. त्यांनी मोठमोठया गावाना भेटी देऊन तेथील अडअडचणी समजाऊन घेऊन, खेडयांना भेटी देऊन तेथील रस्त्याची पहाणी करून त्यांनी आपला रिपोर्ट सादर केला.[2]

## भोगावती कारखाण्याची उभारणी –

"सहकाराशिवाय तरूणोपाय नाही" हया तत्वाचा आदर्श तुळशीदास जाधव यांनी लोकांसमोर मांडला होता. 25 वर्षापूर्वी महाराष्ट्रात पहिला साखर कारखाना उभा राहिला पाहिजे या दृष्टिकोणातून विखे–पाटलांनी प्रवरा शेतकरी सहकारी साखर कारखना उभा केला. तेव्हा

सहकारी तत्वावर आपल्याही तालुक्यात एखादा सहकारी साखर कारखाना उभारण्याचे स्वप्न त्यांनी मनाशी बाळगले. तेव्हा 1969 साली ते लोकसभेवर खासदार म्हणून असताना शिवाजी सहकारी ऑईल मिलच्या इमारतीमध्ये मिटींग घेऊन भोगावती सहकारी साखर कारखाना उभा करण्याचे ठरवले. हजारो वर्षापासून भोगावती नागझरी व सिना या नद्या आपल्या पाण्याचा उपयोग नदीकाठावरील व त्या भागातील लोकांनी आपली शेती पिकवून चांगले सुखी रहावे अशी त्यांची इच्छा होती. लोक या नदीच्या पाण्याचा उपयोग आपल्या शेतीसाठी करून आपला भाग दुष्काळी परिस्थितीतून मुक्त होऊन आर्थिक जीवन सुधारण्याचा प्रयत्न करेल. या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांनी भोगावती सहकारी साखर कारखान्याचे लायसन्स दि. 25/5/1974 रोजी मिळवले व रजिस्ट्रेशन दि. 27/12/1975 रोजी साखर संचालक महाराष्ट्र राज्य यांच्याकडून करून घेतले व प्रत्यक्षात कारखाना उभारणीस दि. 13/8/1979 रोजी करण्यात आली.[3]

या कारखान्याचे कार्यक्षेत्र सोलापूर जिल्हा आणि उस्मानाबाद जिल्हा व त्यातील बार्शी, माढा, मोहोळ, सोलापूर, परांडा, उस्मानाबाद, कळंब, भुम, तुळजापूर हया आठ तालुकयातील सुमारे तीनशे गावात विखुरले असून हया तीनशे गावातून सुमारे आठ हजार सभासद आहेत. अशा प्रकारे तुळशीदास जाधव यांच्या प्रयत्नाने भोगावती सहकारी साखर कारखाना उभा राहिला आहे. सध्या हा कारखाना चांगल्या रितीने सुरू आहे व तो नावलौकीक मिळवत आहे व या कारखाना उभारणीचे श्रेय तुळशीदास जाधव यांनाच द्यावे लागते.

भोगावती सहकारी साखर कारखाना हा इर्ले वैरागच्या व मानेगावच्या सिमेवर उभारण्यात आला आहे. आजवर ज्यांनी ज्यांनी कारखाना काढला त्यांनी त्यांनी आपल्या पक्षाच्या लोकांना

सहभागी करून घेतले. पण तुळशीदासाचे वैशिष्ट हे की त्यांनी पक्षीय दृष्टिकोन न ठेवता सर्व थरातील आणि विविध राजकीय पक्षातील लोकांना सहभागी करून घेतले आहे.[4]

## रेल्वे स्टॅंडींग व्हालंटरी कमेटी –

सन 1973–74 च्या सुमारास रेल्वेखात्याबाबत ब–याच तक्रारी निर्माण झाल्या होत्या. जनतेला भाडयाच्या मोबदल्यात दिल्या जाणा–या सुखसोई त्या मानाने फार कमी प्रमाणात मिळत होत्या. रेल्वेमध्ये लाईट नसते. पाणी नसते इ. अनेक तक्रारी रेल्वे खात्याबाबत निर्माण झाल्या होत्या. रेल्वे खात्यावर व तेथील कारभारावर जनता नाराज होती. रेल्वे खात्यात भष्टाचार होत असल्याचा जनतेचा संशय होता. तुटीचे अंदाजपत्रक तयार होत होते. या सर्व गोष्टीचा छडा लावून सुधारणा कशा करावयाच्या याबाबत अंदाज घेण्यासाठी स्टॅंडींग व्हालंटरी रेल्वे हेल्प कमेटी स्थापन करण्यात आली आणि या कमेटीच्या चेअरमनपदी श्री. तुळशीदास जाधव यांची निवड करण्यात आली. रोड सेफटी कमिटीचे काम त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्यामुळे त्यांना याही कमेटीचे चेअरमन देवून जबाबदारी वाढवली.

तेव्हा त्यांनी ही जबाबदारी स्वीकारून सर्व देशभर दौरा करून कोणत्याही स्टेशनवर उतरून तेथील प्रवाशांच्या अडीअडचणी ऐकून कर्मचा–यांना विश्वासात घेऊन त्यांचेही म्हणणे ऐकून घेत. तेथे जाऊन ते गाडया वेळेवर सुटतात का ? व सुटत नसतील तर वेळेवर न सुटण्याची कारणे विचारीत. एखाद्या स्टेशनवर प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन तेथे एखादी जादा गाडी सोडता येईल का हे पहात. ते स्वतः सर्व रेल्वे चेक करून गाडीमध्ये स्वच्छता आहे का ? पाणी आहे का ?

लाईट आहे का ? या सर्व गोष्टी ते स्वतः पहात असत. गाडीमध्ये वीना तिकीट कोण प्रवास करत असेल तर त्याला पकडून ते कर्मचा–यांना दंड करण्याचे सांगत. अशा प्रकारे त्यांनी रेल्वेचा कारभारामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा मोठया प्रमाणात प्रयत्न केला. हे केल्यानंतर हळूहळू प्रवाशांच्या तकारीचे प्रमाण कमी झाले. हे सर्व करून दादांनी आपल्या कामाचा अहवाल आणि रेल्वे खाते सुधारणा संबंधीचे आपले विचार शासनाला कळवले. न भुतो न भविष्यती असा बदल रेल्वे खात्यात घडला. याचा फायदा असा झाला की 1974 साली 69 ते 70 लाख रूपयाचा फायदा रेल्वे खात्याला मिळाला. तेव्हा त्यांच्या या कार्याचा उपयोग म्हणून रेल्वे कमिटीवर त्यांची नेमणूक केली. [5]

## बॉम्बे रोड ट्रान्स्पोर्टचे अध्यक्ष –

रोड सेफि्ट कमेटीचा अहवाल जाहीर झाल्यानंतर त्यांचे ब–याच ठिकाणी स्वागत झाले. स्वतः पंतप्रधान इंदिरा गांधीनी त्यांच्या कार्याची प्रसंशा केली. रस्त्याच्या माहितीच्या सखोल ज्ञानाचा उद्योग करून घेण्याच्या दृष्टीने मुंबईतील कार्यकर्त्यांनी तुळशीदसाजींना बॉम्बे रोड ट्रान्स्पोर्ट असोशिएशनचे अध्यक्षपद देऊन त्यांचे स्वागत केले व त्यांनी ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली. परंतु या सुमारास देशामध्ये अपघाताचे प्रमाण फार मोठया प्रमाणात वाढले. रस्ते बांधणीत कांही दोष राहिल्याने अपघात घडतात. कांही रस्त्याची वळणे योग्य नसल्याने विशिष्ट एकाच ठिकाणी अपघात वारंवार घडतात व रस्त्यावरून वहाने चालवणारे ड्रायव्हर व वाटसरू यांच्याही कांही चुकामुळे अपघात घडतात. या सर्व कारणामुळे अपघात घडतात असे श्री. तुळशीदास जाधव यांचे मत होते.

या नव्या पदावर काम करत असताना तुळशीदास जाधव यांनी अनेक सूचना व उपाय सांगून अपघात कशाप्रकारे कमी करता येतील याची सर्व माहिती देऊन असोसिएशनला उत्कृष्ट प्रकारे मार्ग दाखवला.[6]

तुळशीदास जाधव यांना कोणतीही जबाबदारी दिली तर ते तन मन धन सर्व एकत्र करून ती जबाबदारी तडीला नेऊन ते यशस्वीपणे पार पाडतात. हे सर्वांच्या लक्षात आले होते. म्हणून या बुध्दीवान व्यक्तीच्या बुध्दीचा ज्ञानाचा फायदा आपल्याला मिळावा या हेतूने त्यांना स्वातंत्र्यसैनिक उच्चाधिकार समितीचे अध्यक्षपद बहाल केले. श्री. तुळशीदास जाधव यांनी 1930 साली "मार्शल लॉ" च्या काळामध्ये जे धाडस दाखवून प्राण गेला तरी मी माझ्या डोळयावरील गांधी टोपी काढणार नाही अशा प्रकारे धाडस दाखवून इंग्रज अधिका–याला नमवले होते. त्यांना भारतीय स्वातंत्र्य लढयातील सैनिकांच्या अडीअडचणी माहीत होत्या व ते त्यांचे सोडवण्याचा प्रयत्न करतील या हेतूने त्यांना हे पद दिले गेले होते.

## स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष –

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्यांनी तुरूंगवास भोगला, स्थानबध्दता सहन केली, भुमिगत दुरावस्थेत फटके खाल्ले, ब्रिटीश जुलूमशाहीला खिळ घातली त्या स्वातंत्र्य सैनिक श्री. तुळशीदास जाधव यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी 1989 या वर्षी तुळशीदासांची स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकारी समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक केली.

या पदाचा कार्यभार सांभाळल्यानंतर श्री. तुळशीदास जाधव यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या मानधनाची मागणी अनेक वर्ष प्रलंबीत होती. ती हाती घेतली. या बाबत सर्व प्रकारची तपासणी व छाननी करून सहा महिन्यात सुमारे साडेचार हजार अर्ज निकालात काढले. परिणामी शासनाने या प्रकारची स्वातंत्र्य सैनिकाला देण्यात येणा–या मानधनाची थकबाकी म्हणून शासनाने सहा ते आठ कोटी रूपये रक्कम त्यांना दिली. आज महाराष्ट्र राज्यात केंद्रशासन व राज्यशासनाचे मानधन प्राप्त असे सुमारे तीस हजार स्वातंत्र्य सैनिक आहेत. भारताच्या तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी 1972 पासून स्वातंत्र्य सैनिकाना मानधन देण्याची सुरूवात केली.

महाराष्ट्र शासनाच्या स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीचे सभापती म्हणून कार्य करत असताना त्यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या गावी जाऊन त्यांची परिस्थिती समजाऊन घेण्याचा सर्वतो प्रयत्न केला आहे. याच काळात त्यांनी राज्यात अनेक दौरे काढले. जिल्हावार गौरव समितीच्या बैठका आयोजित केल्या. या सैनिकांच्या मागण्या, अडीअडचणी व गैरसोई इ. बाबत त्यांनी चौकशा केल्या. चर्चात्मक मेळावे वेळोवेळी भरवले. केवळ कर्तव्याच्या बळापोटीच त्यांना हे सर्व शक्य झाले.

स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये वेळोवेळी हिताचे अनेक निर्णय घेण्यात आले. सरकार तर्फे सैनिकाना सवलती व सन्मान प्राप्त करून देण्यात आले.

1. मानधनात वाढ.
2. रेल्वे व एस्.टी. पास (केंद्रीय सैनिक) व एस्.टी. पास (राज्य सैनिक)
3. माता–पिता किंवा पत्नीचे निधन झाल्यास त्यांच्या अंतविधीसाठी 1,000/– रू. सहाय्य.
4. सैनिकांचे निधनानंतर 5,000/– रूपये सहाय्य.

5. माफक दराने घर बांधीसाठी जमीन.

6. असाध्य आजारासाठी (कॅन्सर, महारोग, क्षयरोग, अर्धांगवायू वगैरे) रू. 3,000/– पर्यंत मदत व सरकारी इस्पितळात औषधाची मोफत सोय.

7. स्वातंत्र्य सैनिकाच्या एका पाल्यास नोकरीत प्राधान्य.

8. शिक्षण सवलती.

9. मुलींच्या विवाहास 5,000/– रूपये अनुदान.

10. मरणोपरान्त सरकारी सलामी.

शासनाने स्वातंत्र्य सैनिकांच्या उतरत्या वयात त्यांना आर्थिक मदत व्हावी या हेतूने मानधन देण्यात येते. स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या त्यागामुळे आजचे स्वराज्य दिसते आहे. त्याचे उतराई होण्याची कर्तव्य भावना आपण जोपासली पाहिजे. तसेच संस्थानिकांनीही सामाजिक सुधारणा व उन्नतीसाठी त्यांच्या हातून स्वराज्य लाभाची फळे सर्व देशवासीयांस कशी चाखावयास मिळतील अशा मार्गाने वाटचाल करणे अत्यंत आवश्यक आहे. अशा प्रकारचे कार्य करून स्वातंत्र्य सैनिकांना आपल्या भावी आयुष्यात नव चैतन्य निर्माण करून देण्याचे कार्य श्री. तुळशीदास जाधव यांनी केले आहे.[7]

## अमेरिकेचा अभ्यास दौरा –

अमेरिकेतील जनता आणि तेथील विविध संस्थामार्फत भेटीचे आमंत्रण आल्याने श्री. तुळशीदास जाधव यांनी 27 जून ते 10 जुलै, 1993 पर्यंत अमेरिकेचा खास दौरा केला. यावेळी न्युयार्क, वाशिंग्टन, होस्टन आणि प्रमुख शहरात संपन्न होणा–या अमेरिकन स्वातंत्र्यदिन

समारंभास 4 जुलै रोजी ते एक सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. वॉशिंग्टनमध्ये त्यांनी कॉंग्रेसजन व सिनेटर्स यांच्या मुलाखती घेऊन चर्चा केली. या दौ–यामध्ये असताना त्यांना युनोमध्येही बोलावण्यात आले होते. वॉशिंग्टनच्या चर्चेमध्ये भारत व अमेरिका या विषयी अमेरिकेने भारतास काश्मिर समस्येविषयी बिनशर्त पाठींबा दिला पाहिजे अशी तुळशीदासजींची भूमिका होती.

भारतीय शिष्टमंडळाच्या वरील भूमिकेस अमेरिकेने जरूर् पाठींबा दिला आहे. मात्र त्याचबरोबर कांही भारतीय वृत्तपत्राद्वारे काश्मिरमध्ये भारत सरकारकडून मानवी हक्काची पायमल्ली होत असते असा विषारी प्रचार केला आहे. त्यामुळे अमेरिकेची द्विधा मनःस्थिती झाली आहे.

युनोमधील वृत्तपत्र प्रतिनिधी बरोबर आयोजित बैठकीत असे दिसून आले की, काश्मिर प्रश्नाबाबत सर्वसामान्य इस्लामी राष्ट्रांचा पाठींबा पाकिस्तानला आहे. एकूण मुस्लीम राष्ट्रे हा प्रश्न पाकिस्तानच्या बाजूने उचलून धरतात व एकमेकाना पाठींबा देतात. आंतरराष्ट्रीय युनो या संस्थेची आज 184 राष्ट् सभासद असून त्यापैकी 55 इस्लामी राष्ट्रे सभासद आहेत. त्या सर्वांचा पाकिस्तानला पाठींबा आहे. युनोमध्ये त्यामानाने इतर राष्ट्रे सभासदात भारतीय भुमिकेचा प्रचार फारच कमी असून भारताविरोधी पाकचा प्रचार जास्त आहे असे या शिष्टमंडळाबरोबर झालेल्या बैठकीतून समजले आहे. या विषयी तुळशीदास आपले विचार प्रकट करतात की, गंभीर समस्येबाबत भारतानेही युनोमध्ये जास्तीत जास्त प्रभावी पाठींबा मिळविण्यासाठी अन्य राष्ट् सभासदामध्ये गुणात्मक प्रचार वाढवणे आवश्यक आहे. भारतीय भूमिकेचा प्रचार आणि प्रसार कमी होण्याची कारणे शोधणे अत्यावश्यक असून भारत सरकारने ही समस्या गौण न समजता त्याकडे

लक्ष देणे अत्यंत जरूरीचे आहे. आपले मतभेद आंतरराष्ट्रीय चव्हाटयावर न आणता देशाच्या भल्यासाठी मर्यादेबाहेर स्वदेशातील सत्ताधा–यांना बदनाम न करता संयम राखून लोकशाही मार्गाने सर्व भारतीयांचे विचार करणे, वागणे बोलणे असले पाहिजे. तरच कोणत्याही समस्या सामोपचाराने सोडवण्याचा मार्ग खुला होऊ शकतो असे ठाम मत तुळशीदासजींनी या दौ–यावरून परतल्यावर आयोजिलेल्या खास पत्रकार परिषदेपुढे व्यक्त केले व आपली भूमिका विषद केली. 8

## शांतता पुरस्कार –

श्री तुळशीदास जाधवांनी आपल्या ज्ञानाच्या आधारे भारत देशामध्ये भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीच्या अगोदर भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी गांधीजींनी शांततेच्या मार्गाने भारताला सत्य, अहिंसा व शांती या मार्गाने स्वातंत्र्य मिळविण्यासाठी तुळशीदासजींना ही इतर कार्यकर्त्यांबरोबर तुरूंगवास भोगावा लागला. भारतीय राजकारणामध्ये त्यांनी वेगवेगळया पदावर काम केले. परंतु त्यांनी आपली प्रवृत्ती अशी ठेवली की, कोणत्या ही विरोधकाला विरोध न करता आपले सर्व आहेत अशी भूमिका घेतली होती आणि त्यांनी महात्मा गांधीजींचा संदेश सर्व देशभर प्रसारीत करण्याचा प्रयत्न करत होते. त्यांनी आपल्या जनसंपर्काने व भाषे ेवर प्रभुत्व प्रस्थापित करून परदेशामध्ये ही आपले विचार मांडले आहेत.

1994–95 हे वर्ष महात्मा गांधींचे 125 वे जयंती वर्ष म्हणून जगभर साजरे झाले. महात्माजींच्या विचारप्रणालीचा प्रसार, प्रचार करणा–या "नॉर्वे" देशाच्या "ओस्लो" येथील राजधानीतील Mahatma M.K. Gandhi Foundation for non-

vlolent Peace या विख्यात संस्थेने या वर्षानिमित्त श्री. तुळशीदास जाधव यांना गांधी शांतता पुरस्कार प्रदान करून त्यांचा ओस्लोमध्ये आंतरराष्ट्रीय बहुमान केला होता. या कार्यक्रमासाठी जागतिक शांतता समीतीचे महासचिव डॉ. हंस लुंडर यांनी तुळशीदासजींना महात्मा गांधींची सोन्याचा मुलामा दिलेली प्रतिमा भेट दिली. त्यांना प्रदान केलेले सन्मान चिन्ह आणि प्रशस्तीपत्रक व 20 हजार नॉर्वेजीयन क्रोस भारतीय चलनातील 1 लाख रूपयाचा धनादेश फाऊंडेशनचे उपाध्यक्ष प्रा. अमलेंदु गुहा यांनी दिले. या शानदार सोहळयाला जागतिक शांतता समितीच्या प्रचारक महिला सदस्या डॉ. कॅरोल ब्रुस आणि भारतातील राजदुत एस्.के. माथुर हे उपस्थित होते.

तुळशीदासजी नॉर्वेचा हा कार्यक्रम आटपल्यानंतर ते भारतास आले व त्यांनी भारताचे राष्ट्पती मा.डॉ. शंकर दयाळ शर्मा यांची सदिच्छा भेट घेतली. तेव्हा "तुळशीदास आपने भारत की शासन सारी दुनिया में बढाई" अशा भारावलेल्या शब्दात राष्ट्रपतींनी त्यांचे स्वागत केले.

त्यानंतर तुळशीदासजीनी लंडन, बर्मिंगहॅम, वॉशिंग्टन, बोस्टन, सिॲटल आदि जगातील प्रमुख शहरातील खास निमंत्रणावरून इंग्लंड अमेरिकेचा खास दौरा केला. या दरम्यान त्यांचे तेथील भारतीयासह परदेशीयांनी ही उत्स्फूर्त स्वागत केले. त्यावेळी त्यांनी महात्मा गांधीचे तत्वज्ञान व अहिंसेचा दृष्टीकोन तेथील जनतेला समजावून सांगण्याचा प्रयत्न त्यांच्या व्याख्यानातून केला. [9]

श्री. तुळशीदास जाधव यांनी महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणामध्ये आपले स्थान निर्माण केले होते. ते वयाने वृध्द झाले असले तरी ते मनाने व कार्याने व तरूणांना लाजवेल

अशा प्रकारे सर्वसामान्य जनतेचे कार्य करत होते. परंतु कांहीही झाले तरी सर्वांना एक ना एक दिवस हे सर्व विश्व सोडून जावे लागते ? या न्यायाने सर्वसामान्य जनतेच्या ह्रदयसिंहासनावर आपले अधिराज्य निर्माण करून 11 सप्टेंबर, 1999 रोजी काळाच्या पडद्याआड गेले व त्यांच्या कर्तृत्वाने व कार्याने ते सर्व देशभर अजरामर झाले.

---

# प्रकरण पाचवे

## संदर्भ सूची


1. दे. भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ (207), एम्.बी. साळुंखे.

2. उपरोक्त.

3. उसमळा, पान नं. 19, वसंत काणे.

4. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 215, व्यं.गो अंदुरकर

5. दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ पान नं. 209 ते 210, एम्. बी. साळुंखे

6. उपरोक्त, पान नं. 210, 211.

7. दृष्टिक्षेपात स्वातंत्र्य सैनिक,उच्चाधिकार समितीतील माझा कार्यकाल, तुळशीदास जाधव.

8. आवाहन, पान नं. 78, दिलीप रूद्राक्ष.

9. अवाहन, पान नं. 116, दिलीप रूद्राक्ष.


———————